**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पीएम सेतू अंतर्गत महाराष्ट्र, ओडिशा आणि जम्मू-काश्मीरमधील ITI समूहांसाठी सुमारे एक हजार १९४ कोटी रुपयांच्या पाच धोरणात्मक गुंतवणूक योजनांना मंजुरी.**
2. **आंदोलनं आणि निदर्शनांचं वार्तांकन करण्यासाठी प्रेस काउन्सिलची मार्गदर्शक तत्त्वं जारी.**
3. **प्रस्तावित लोह प्रकल्पासाठी शेतजमीनिच्या अधिग्रहणाविरोधात गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शीत दोन दिवसांपासून चक्काजाम आंदोलन.**
4. **जगातली पहिली मिश्र क्रिकेट स्पर्धा येत्या १४ नोव्हेंबरपासून श्रीलंकेत होणार.**

---------------------------------------------

प्रधानमंत्री कौशल्य विकास

प्रधानमंत्री कौशल्य विकास आणि रोजगारक्षमता परिवर्तन योजना (PM-SETU) अंतर्गत महाराष्ट्र, ओडिशा आणि जम्मू-काश्मीरमधील ITI अर्थात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या समूहांसाठी १ हजार १९४ कोटी ९२ लाख रुपयांच्या पाच धोरणात्मक गुंतवणूक योजनांना मंजुरी देण्यात आली. पीएम सेतू अंतर्गत सहावी राष्ट्रीय संचालन समितीची बैठक आज कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या मंजुरींसह PM-SETU योजनेंतर्गत आजपर्यंत मंजूर झालेल्या एकूण गुंतवणुकीचे मूल्य ३ हजार ६८७ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. भारत सरकारच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करून त्यांना उद्योगांच्या गरजांशी सुसंगत आणि भविष्यातील कौशल्यांच्या मागणीसाठी सज्ज असलेल्या कौशल्य प्रशिक्षण संस्थांमध्ये रूपांतरित करण्याच्या प्रयत्नांतील हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

---------------------------------------------

सीजेपी

कॉक्रोच जनता पार्टीचे  नेते अभिजीत दिपके यांना आज त्यांच्या निवासस्थानावरून पोलिसांनी ताब्यात घेतलं. दिल्लीतील कॅनॉट प्लेस इथं आज पक्षाच्या प्रस्तावित

‘लहरा दो तिरंगा’ आंदोलनात सहभागी होण्यासाठी ते बाहेर पडत असताना ही कारवाई करण्यात आली. दरम्यान राजधानी दिल्लीत प्रस्तावित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

---------------------------------------------

आक्षेपार्ह टिपणी

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायालयाबाबत आक्षेपार्ह टिप्पणी केल्याबद्दल खासदार संजय राऊत आणि पत्रकार निखिल वागळे यांना सर्वोच्च न्यायालयाने कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. विरोधी पक्षांच्या प्रतिनिधीमंडळाला व्यक्तिगत भेट नाकारुन, न्यायालयात याचिका दाखल करण्याचा सल्ला सरन्यायाधीशांनी दिल्यानंतर या दोघांनी प्रसारमाध्यमांमधे आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. ती सभ्यतेच्या मर्यादा ओलंडणारी होती, त्यामुळे नागरिकांचा न्यायालयावरचा विश्वास उडू शकतो, असा आरोप करणारी याचिका सुप्रीम कोर्ट बार असोसिएशननं दाखल केली आहे. दरम्यान खासदार संजय राऊत आणि पत्रकार निखिल वागळे यांनी सर्वोच्च न्यायालयाची माफी मागितली आहे.

---------------------------------------------

वार्तांकन नियम

देशातली आंदोलनं आणि निदर्शनांचं वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांसाठी भारतीय प्रेस काउन्सिलने मार्गदर्शक तत्त्वं जारी केली आहेत. पत्रकारितेची कर्तव्यं प्रभावीपणे पार पाडण्यास मदत करण्याबरोबरच माध्यम कर्मचाऱ्यांची सुरक्षा, जबाबदार वार्तांकन आणि पत्रकार, माध्यम संस्था आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणांमध्ये उत्तम समन्वय साधण्यासाठी ही मार्गदर्शक तत्त्वं जारी केल्याचं काउन्सिलनं म्हटलं आहे. पत्रकारांना त्यांच्या माध्यम संस्थांनी किंवा पत्र सूचना कार्यालय आणि माहिती आणि प्रसिद्धी संचालनालयाने मान्यता दिलेलं ओळखपत्र सोबत बाळगण्याचा आणि निदर्शनांचं वार्तांकन करताना ते स्पष्टपणे दिसेल अशा ठिकाणी ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. आंदोलनांचं वार्तांकन करताना पत्रकारांनी तटस्थ राहून व्यावसायिकता राखण्याच तसंच पोलिसांच्या कामात हस्तक्षेप न करण्याचं आवाहनही काउन्सिलनं केलं आहे.

---------------------------------------------

सेवा संकल्प-स्वच्छ इंधन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि

नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं होत आहे. यानिमित्त विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबाबत -

***(व्हॉइस कास्ट - धैर्यशील)***

***स्वच्छ इंधन, उत्तम आरोग्य आणि महिलांचे सक्षमीकरण या उद्देशाने केंद्र सरकारने २०१६ मध्ये प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेची सुरुवात केली. या योजनेअंतर्गत गरीब कुटुंबांतील महिलांना मोफत LPG गॅस जोडणी उपलब्ध करून देण्यात आली. मे २०२६ पर्यंत देशात १० कोटी ५० लाखांहून अधिक गॅस जोडण्या देण्यात आल्या आहेत. या योजनेमुळे अनेक कुटुंबांना लाकूड, गोवऱ्या आणि इतर पारंपरिक इंधनांऐवजी स्वच्छ इंधनाचा वापर करण्याची संधी मिळाली. त्यामुळे घरातील धुरामुळे होणारे वायुप्रदूषण कमी होण्यास आणि महिलांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास मदत झाली आहे. तसेच, सरपण गोळा करण्यासाठी लागणारा वेळ वाचल्याने महिलांना शिक्षण, रोजगार आणि उत्पन्नवाढीच्या संधींकडे अधिक लक्ष देता येत आहे. त्यामुळे प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही केवळ स्वयंपाकासाठी गॅस जोडणी देणारी योजना नसून, महिलांचे आरोग्य, वेळेची बचत आणि आर्थिक स्वावलंबन यांना चालना देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे.***

---------------------------------------------

आंदोलन

प्रस्तावित लोह प्रकल्पासाठी एमआयडीसीने शेतजमीन अधिग्रहीत करु नये, या मागणीसाठी १४ गावांतील शेकडो पुरुष आणि महिला शेतकऱ्यांनी १५ ऑक्टोबरपासून चामोर्शी इथं चक्काजाम आंदोलन सुरु केलं आहे. चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा परिसरात जेएसडब्लू कंपनीने स्टील प्रकल्प प्रस्तावित केला आहे. त्यासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या कृतीला विरोध करण्यासाठी कालपासून चामोर्शीच्या मुख्य चौकात चक्काजाम आंदोलन सुरु आहे . रात्री शेतकऱ्यांनी रस्त्यालगत स्वयंपाक करून आंदोलनस्थळीच जेवण आणि मुक्कामही केला. आज दुसऱ्या दिवशीही शेतकऱ्यांचं आंदोलन सुरुच होतं. आधी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन चर्चा करावी, नंतरच पुढील प्रक्रिया करावी, अशी शेतकऱ्यांची भूमिका आहे.

---------------------------------------------

सोशल मीडिया वापर

मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध घालून त्यांना ऑनलाइन धोक्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर नियम तयार करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. या प्रकरणी केंद्र सरकारकडून उत्तर मागविण्यात आलं  असून, पुढील सुनावणी 3 डिसेंबर रोजी होणार आहे.

---------------------------------------------

धम्मचक्र उत्सव

चंद्रपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर हजारो बौद्ध जनतेच्या उपस्थितीत ७०वा धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळा होणार आहे. या सोहळ्याच्या निमित्तानं शहराच्या मध्यभागी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून भव्य यात्रा काढण्यात आली. यात्रेच्या मध्यभागी डॉ.आंबेडकरांच्या अस्थींचा कलश होता. हजारोंच्या संख्येने बौद्ध जनता या मिरवणुकीत सहभागी झाली. या ठिकाणी सामुहिक बुद्धवंदना पार पडली.

---------------------------------------------

कर्जमाफीचा लाभ

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत भंडारा जिल्ह्यात आतापर्यंत १८ हजार ४३० शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. जिल्ह्यातील २०४ ऑनलाइन तक्रारींपैकी १८१ तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून, २३ तक्रारी प्रलंबित आहेत. जिल्ह्यातील २६ हजार ७४२ पात्र शेतकऱ्यांपैकी २३ हजार ४४ शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण झाले आहे. उर्वरित शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी दिले आहेत. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या १ हजार २८ शेतकऱ्यांना ४ कोटी २१ लाख रुपयांचे नवीन खरीप कर्जवाटपही करण्यात आले आहे.

---------------------------------------------

कार्यशाळा

अकोला महिला आणि बाल विकास विभागाच्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' बाल संरक्षण यंत्रणेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. बाल लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम (POCSO), बालकांशी सुसंवाद, समुपदेशन प्रक्रिया, बालगृहातील दैनंदिन दिनचर्या तसच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यांबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आल. कार्यशाळेचं उद्घाटन अकोला बाल न्याय मंडळाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती रोशनी

बन्सल यांच्या हस्ते झालं. बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष ॲड.अनिता गुरव अध्यक्षस्थानी होत्या.

---------------------------------------------

टेस्ट २० क्रिकेट

क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच मिश्र क्रिकेट स्पर्धा श्रीलंकेत होणार आहेत. येत्या १४ नोव्हेंबरपासून सुरू होतील. या प्रकाराला टेस्ट ट्वेंटी असं नाव देण्यात आलं असून या स्पर्धेत जगभरातले १३ ते २१ वर्षं वयोगटातले १६० क्रिकेट खेळाडू सहभागी होतील. कसोटी, एकदिवसीय आणि टी-ट्वेंटी क्रिकेट प्रकारानंतरचा हा नवा प्रकार असेल. यात प्रत्येक संघात ११ पुरुष आणि ११ महिला खेळाडू एकामागोमाग एक उतरून धावा करतील, मात्र त्या धावा एकाच संघाची धावसंख्या म्हणून गणल्या जातील. या स्पर्धेतला प्रत्येक सामना एकाच दिवसात खेळवला जाईल. एकूण ८० षटकांच्या या सामन्यात प्रत्येक संघ दोन वेळा फलंदाजी करेल. पहिली ४० षटकं कसोटी क्रिकेट प्रमाणे पांढरे कपडे आणि लाल चेंडूत तर उर्वरित ४० षटकं रंगीत कपडे आणि पांढऱ्या चेंडूत खेळवली जातील.

---------------------------------------------

कॉलर नेम प्रेझेंटेशन

सायबर फसवणूक आणि स्पॅम कॉल्स रोखण्यासाठी केंद्र सरकारने पुढील महिन्यापासून सर्व टेलिकॉम कंपन्यांना ‘कॉलर नेम प्रेझेंटेशन’ सेवा अनिवार्य केली आहे. यामुळे बँकिंगशी संबंधित फसवणूक, घोटाळे आणि खोटे फोन करणाऱ्यांची खरी नावं समोर येऊन सायबर फसवणुकीला आळा बसण्यास मदत होईल. सध्या या सुविधेअंतर्गत केवळ फोन नंबरच प्रदर्शित होतो. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणानुसार या सेवेअंतर्गत कोणत्याही अनोळखी क्रमांकावरुन फोन आल्यास, फोन करणाऱ्याचं नाव हे त्याच्या केवायसी नोंदीनुसार आपल्या मोबाईल स्क्रीनवर दिसेल. त्यासाठी आपल्याला इतर कोणतंही ॲप डाऊनलोड करण्याची आवश्यकता राहणार नाही.

---------------------------------------------

अन्न दिन

जागतिक अन्न दिनानिमित्त केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी, अन्न हेच पूर्णब्रह्म असून ते साक्षात जीवनाचा आधार असल्याचं म्हटलं आहे. यानिमित्त समाज माध्यमावर जारी केलेल्या संदेशात त्यांनी, आपल्या आसपास कुणीही भुकेले राहणार नाही याची काळजी घेण्याचं आणि यासाठी एकत्रित

संकल्प करण्याचं आवाहन केलं. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या ‘अन्न आणि कृषी संघटनेची’ स्थापना झाल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. “आजचे नवसंशोधन, उद्याचे पोषण” ही यंदाच्या जागतिक अन्न दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

---------------------------------------------